अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, अहमदनगर यांचे अधिपत्याखालील कार्यकारी अभियंता, कडवा कालवा विभाग, नाशिक व त्याअंतर्गत ४ उपविभागातील नियत अस्थायी आस्थापनेवरील पदांना व रुपांतरीत अस्थायी आस्थापनेवरील पदांना दिनांक ०१/०१/२०१८ ते २८/०२/२०१८ या कालावधीकरीता मुदतवाढ.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्र. मुदत -०२१७/प्र.क्र.१००/१७/मोप्र-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २९ जानेवारी, २०१८

वाचा :- १) शासन निर्णय, जलसंपदा विभाग क्र.मुदत-०२१७/प्र.क्र. १००/मोप्र-१, दिनांक ११/१०/२०१७.
२) अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, अहमदनगर यांचे पत्र जा.क्र. लाक्षेविप्रा/आ-२/६२४६/सन २०१७, दिनांक २०/१२/२०१७.

शासन निर्णय :

अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, अहमदनगर यांचे अधिपत्याखालील कार्यकारी अभियंता, कडवा कालवा विभाग व त्याअंतर्गत ४ उपविभागातील नियत अस्थायी आस्थापनेवरील १०६ पदांना व रुपांतरीत अस्थायी आस्थापनेवरील ३६ पदांना दिनांक ०१/०१/२०१८ ते दिनांक २८/०२/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. नियत अस्थायी आस्थापनेवरील पदांवर होणारा खर्च “मागणी क्र. आय-५, ४७०१- मोठे व मध्यम पाटबंधारे यावरील भांडवली खर्च (योजनेत्तर) (८०) सर्वसाधारण १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका, (०४) योजनेत्तर (०४) (०५) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळास, भाग भांडवली अंशदान (४७०१ आय २०४)” या लेखाशिर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यांत यावा.

रुपांतरीत अस्थायी आस्थापनेवरील पदांवर होणारा खर्च “मागणी क्र. आय-५, ४७०१- मोठे व मध्यम पाटबंधारे यावरील भांडवली खर्च (योजनांतर्गत) (८०) सर्वसाधारण, (१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका, (०२) योजनांतर्गत (०२)(०५) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान (४७०१ एच ८९९)” लेखाशिर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यांत यावा.

३. हे आदेश वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दिनांक ०८/०१/२०१८ अन्वये प्रशासकिय विभागांना प्रदान केलेल्या प्राधिकरानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१८०१२९१३११३५६६२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vijendra
Prabhakar
Palwankar

Digitally signed by Vijendra Prabhakar Palwankar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7cb5ce90d018bdc109ad48f37ca4a3b06b0347375607bff9b7cc525c4c213e75, serialNumber=1525bd95a04e2d242eaa74f8dbc215ca88aa7bfb907686a9a62b37f3a74e5eba, cn=Vijendra Prabhakar Palwankar
Date: 2018.01.29 13:16:56 +05'30'

(वि.प्र.पालवणकर)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत सहपत्रासह -

१) महालेखापाल (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,

२) कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद,

३) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, उत्तर महाराष्ट्र प्रदेश, नाशिक,

४) अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक,

५) कार्यकारी अभियंता, कडवा कालवा विभाग, नाशिक व त्याअंतर्गत उपविभागीय कार्यालये,

६) अर्थ-१ कार्यासन, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,

७) कक्ष अधिकारी (आ./प्रशि.), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,

८) मोप्र-१ (संग्रहार्थ).